# गुरसाळेत वाळू माफियांचा खुलेआम हल्ला

पान ८ वर

- सकल मराठ्यांच्या आंदोलनात ‘कारण–राजकारणा’ चा स्फोट
- सोलापुरात रिपाइं लढणार
- आ. देशमुखांना खासदारकीच्या सिंहासनाची म्हणे भुरळ नाहीच !

अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## विधिमंडळाचे आजपासून अधिवेशन

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, उद्या, सोमवारपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर विरोधी पक्ष आक्रमक होण्याची चिन्हे आहेत. भाजप आमदार गणपत गायकवाड यांचा भर पोलीस ठाण्यातील गोळीबार, पुण्यात सापडलेला हजारो कोटींचा अमलीपदार्थांचा साठा यावरून विरोधक सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याची शक्यता आहे. अधिवेशनात दुसऱ्या दिवशी म्हणजे, २७ फेब्रुवारीला लेखानुदान अर्थात अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात येईल.

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १४८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# फडणवीसांकडून मला विष देण्याचा प्रयत्न

## मनोज जरांगे पाटील यांची सागर बंगल्याच्या दिशेने कूच, मात्र कार्यकर्त्यांनी रोखले

आंतरवली सराठी/विशेष प्रतिनिधी



**मला सलाईनमधून विष देण्याचा किंवा माझा एन्काऊंटर करण्याचा देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. अजय बारस्कर आणि संगिता वानखेडे यांना फडणवीस यांनीच माझ्या अंगावर सोडले आहे. मी मेलो की मराठा समाजची एकजूट मोडण्याची शक्यता फडणवीस यांना वाटते. त्यामुळेच मला संपवण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी केल्याचा गंभीर आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांनी केला. दरम्यान आपल्याला लावलेले सलाइरन काढून टाकत त्यांनी मुंबईत सागर बंगल्यावर जाण्याचा निर्णय घेतला. मात्र कार्यकर्त्यांनी त्यांची समजूत काढली. या साऱ्या नाट्यमय घटनांच्या पार्श्वभूमीवर आंतरवली सराटीत राज्यभरातून आलेल्या मराठा आंदोलकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचे चित्र पहायला मिळाले.**

किर्तनकार अजय बारसकर आणि संगीता वानखेडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. या दोघांच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आज (२५ फेब्रुवारी) पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत जरांगे पाटलांनी बारसकर-वानखेडेंच्या आरोपांना उत्तरं दिली. तसेच या दोघांमागे देवेंद्र फडणवीस आहेत. हे राज्य एकनाथ शिंदे किंवा अजित पवार नव्हे तर देवेंद्र फडणवीस चालवत आहेत. ओबीसींमधून मराठ्यांना आरक्षण न मिळण्यामागे देवेंद्र फडणवीसच आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

जरांगे पाटील म्हणाले, मला सलाईनमधून विष देऊन मारण्याचा कट रचला आहे. १० टक्के आरक्षण घेऊन मी गप्प बसावे अन्यथा मला विष देऊन मारण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मी शांत बसावे अन्यथा माझा गेम करावा लगेल, अशी योजना फडणवीसांनी आखली आहे. फडणवीस त्यांच्या लोकांना सांगत आहेत की, मनोज जरांगेला बदनाम करा, त्याला सलाईनमधून विष देऊन मारा किंवा त्याचा एन्काऊंटर करा.

(पान ५ वर...)



▸▸ आमचा ३८% मराठा रस्त्यावर आल्यासारखे वाटले. देवेंद्र फडणवीस चा चेहरा या सर्वांच्या पाठीमागे आहे हे आम्ही अनेक वेळा सांगितले होते मनोज जरांगे यांनी आज ते उघडकीस आणले. देवेंद्र फडणवीस मराठा समाजाचे दुश्मन आहेत मराठा समाजाला आरक्षण मिळवणे ही त्यांची प्रवृत्ती आहे. यापुढे मनोज जरांगे सांगतील ते धोरण आणि तोरण म्हणून त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहील.

**-पुरूषोत्तम बरडे**

---



▸▸ जरांगे-पाटील यांनी निभावलेली शांततेची आणि प्रामाणिकपणाची भूमिका आहे. त्यांनी चार पाच महिने मोठ्या त्रासातून आंदोलन उभे केले. त्या आंदोलनास वेगळे वळण लागावे, यासाठी वेगळी शक्ती कार्यरत आहे. त्याच्या बळी जरांगे-पाटील यांनी पडू नये. याच परिणाम समाज बांधवांवर पर्यायाने महाराष्टावर पडेल. महाराष्ट्राला वेगळे वळण लागले तर चुकीचा संदेश जाईल.

**-बच्चू कडू, आमदार**

---



▸▸ मराठा आरक्षणापेक्षा देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करण्याची सुपारी जरांगे-पाटील यांना दिल्याचा माझा स्पष्ट आरोप आहे. टार्गेट करण्याचे काम ते इमाने इतबारे करताहेत. त्यांच्या एका सहकार्याने स्पष्ट केले आहे, त्यांचा बोलविता धनी कोण ते. त्यांचा ताण वाढला आहे. पण त्यांनी आतीतायीपणा करु नये.

**-प्रवीण दरेकर, भाजप नेते, महाराष्ट्र**

---



▸▸ जरांगे-पाटील यांचे आंदोलन हे आरक्षणासाठी आहे की उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने राजकारण करण्यासाठी हे समजत नाही. मराठा समाजाचे हित बाजूला राहात आहे.सगेसोयऱ्यांची मागणी कधी ना कधी पूर्ण होईलच. सागर बंगल्याच्या अगोदर आम्ही पण एक भिंत म्हणून तिथे उभे आहोत, आगोदर आमची भिंत पाडा, मग सागर बंगल्यापर्यंत पोचा.

**-नितेश राणे, आमदार**

---



▸▸ महाराष्ट्रात आता प्रत्येक आलेल्या प्रत्येक सरकाराने मराठ्यांची फसवणूक केली आहे. सध्याचे विद्यमान सरकारनेदेखील तेच केले. या समाजाला देऊ केलेले १० टक्के आरक्षण अजिबात टिकणारे नाही. निवडणुकांच्या तोंडावर मराठ्यांना खूष करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठ्यांमध्ये फूट पाडण्याच्या प्रयत्न श्री. फडणवीस यांचा आहे. आम्ही श्री. जरांगे यांच्यासमवेत आहोत. आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**- सोमनाथ राऊत, मराठा समाज नेता, सोलापूर**

---



▸▸ आरक्षणासाठी मराठ्यांना जो शब्द दिला आहे, तो पाळला जाणार नसेल तर असा उद्रेक नक्कीच होणार. सध्या मराठ्यांचा उद्रेक आहे. भविष्यात धनगर समाजाचादेखील उद्रेक होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धनगर समाजालादेखील आरक्षणाचा शब्द दिला आहे. तो पूर्ण होत नसल्याने धनगर समाजाच्यावतीने आंदोलनाचा इशारा देत आहोत. सरकार जे करत आहे, तेच भोगत आहे. समाजांना दिलेल्या शब्दांची किंमत या सरकारला खूप मोजावी लागेल. सत्तेसाठी हे सरकार काहीपण करायला तयार आहे, मात्र ते टिकणारे नाही. जे कराल, ते भोगाल.

**-चेतन नरोटे, शहराध्यक्ष,काँग्रेस समिती,सोलापूर**

---



▸▸ आरक्षणासंबंधी जरांगे-पाटील यांची भूमिका संविधानाला धरुन नाही. ती चुकीची आहे. लोकशाहीमध्ये असे चालत नाही. मराठा आरक्षणासंबंधी पहिल्यापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे जगजाहीर आहे. यापूर्वी त्यांनी आरक्षण दिले होते. त्यात काही त्रुटी राहिल्याने ते रद्द झाले. मात्र, नव्याने आरक्षण देताना सर्व त्रुटींची पुर्तता करुनच टिकणारे आरक्षण दिलेले आहे. या सरकारने दिलेले मराठा आरक्षण हे गरजवंत मराठ्यांना नक्कीच फायद्याचे ठरणारे आहे. विषप्रयोगासंबंधी श्री. फडणवीस यांच्यावर केलेले आरोप असमर्थनीय आहेत.

**-नरेंद्र काळे, शहराध्यक्ष भाजपा, सोलापूर**

## जरांगे यांचे आरोप धादांत खोटे : फडणवीस

**मुंबई :** मनोज जरांगेंनी केलेले आरोप हे धादांत खोटे आहेत. आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे. मात्र कायद्याचे पालन होत नसेल तर पोलिसांना योग्य कारवाई करावीच लागेल, असा पलटवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. जरांगे यांचा बोलवता धनी शरद पवार आणि उध्दव ठाकरे असल्याचा आरोपही फडणवीस यांनी अप्रत्यक्षरित्या केला. ते विवारी मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, सागर बंगला हा सरकारचा आहे. सरकारी काम घेऊन कोणीही या बंगल्यावर येऊ शकतो. मनोज जरांगे हे कोणत्या निराशेतून बोलत आहेत. त्यांना कोणती सहानुभूती घ्यायची आहे, याची मला कल्पना नाही. त्यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. ते धादांत खोटं बोलत आहेत. मराठा आरक्षणासाठी मी काय केलं हे मराठा समाजाला माहिती आहे. आजचा सारथी किंवा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ हे मराठा विद्यार्थी, तरुणांसाठी आशेचं स्थान आहे. त्याची सुरुवात मी केलेली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनांत वाढ केलेली आहे.

मराठा आरक्षण मी उच्च न्यायालयात टिकवलेलं आहे. जोपर्यंत मी मुख्यमंत्री होतो तोपर्यंत ते आरक्षण सर्वोच्च न्यायालयातही टिकवलं. माझं मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर ज्यांच्यावर मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी होती, ते मुख्यमंत्री सर्वोच्च न्यायालयात आरक्षण टिकवू शकलेले नाहीत. त्यामुळे कोणाच्या म्हणण्यावर मराठा समाज विश्वास ठेवेल हे माणणाऱ्यांत मी नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

(पान ५ वर...)

## सोलापुरी मराठ्यांचा उद्रेक

सुराज्य/सोलापूर

मनोज जरांगे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विष प्रयोगाचा आरोप करुन त्यांच्या मुंबईमधील सागर बंगल्यावर चाल करुन निघण्याच्या भूमिकेवर आमदार नितेश राणे तसेच अतूल भातखळकर, प्रसाद लाड यांनी केलेल्या टीकेचा तीव्र निषेध रविवारी (ता. २५) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आला. या संबंधितांच्या प्रतिकात्मक प्रतिमेस जोडे मारण्यात आले.



**सागर बंगल्यावर सोलापुरी मराठ्यांची चाल**

आरक्षणाचे प्रणेते मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईतील उपमुख्यमंत्र्यांच्या सागर बंगल्यावर रविवारी चाल केली. त्याला समर्थन देण्यासाठी सोलापुरातील नेते या बंगल्यावर धडक मारण्यासाठी मार्गस्थ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### राणे, भातखळकर, लाडांच्या प्रतिमा पायदळी

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच खरे मराठा आरक्षण विरोधक आहेत, असे सांगत यावेळी मोठी घोषणाबाजी करीत त्यांचा निषेध करण्यात आला. मराठा आरक्षण आंदोलन हाणून पाडणाऱ्या फडणवीस यांना किंमत दाखवू असा नाराही यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी पुरुषोत्तम बरडे, पद्माकर उर्फ नाना काळे, राजन जाधव, रवी मोहिते, महादेव गवळी, हेमंत पिंगळे, चंद्रकांत जाधव, ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तोल–मोल के बोल...



गेल्या काही काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर सिंचन घोटाळा, राज्य सहकारी बँकेतील घोटाळ्याचे आरोप केले होते. आमची मागणी आहे की, या घोटाळ्यांची त्यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.



**शरद पवार**
संस्थापक राष्ट्रवादी

# गुरसाळेत वाळू माफियांचा खुलेआम हल्ला

## तलवारी, कोयते घेऊन महसूल पथकावर हल्ला; शासकीय वाहनांची तोडफोड









### ▸▸ तहसीलदार गाडीवर हल्ला; सुदैवाने तहसीलदार सचिन लुंगोटे गाडीत नव्हते

सुराज्य/पंढरपूर

वाळुचोरी रोखण्यासाठी आलेल्या महसूल प्रशासनाच्या पथकावर तलवारी, कोयते आणि कुऱ्हाडी घेऊन आलेल्या जमावाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या जमावाने पळून जाणाऱ्या पथकावर तुफानी दगडफेक केली.

पथक जीव वाचवण्यासाठी पळून गेल्यावर तेथे असणारे जेसीबी आणि अन्य वाहने या जमावाने घटनास्थळावरून पसार केली. तहसीलदारांच्या गाडीतून आलेल्या पथकावरच हल्ला होण्याची ही भयावह आणि अंगावर काटा आणणारी घटना पंडपूरपासून जवळ असणाऱ्या गुरसाळे गावात घडला.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार सचिन लंगुटे आणि अप्पर तहसीलदारांनी घटनास्थळावर धाव घेतली. त्यावेळी सुरू न झालेले एक वाहन त्यांना दिसले. त्यांणी ते ताब्यात घेतले.

वाळुतस्करांच्या या भयावह उपद्व्यापाने पंढरपूरमध्ये भीतीचे वातावरण आहे. कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही, अशी विचारणा होत आहे.

याबाबत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे पाचच्या सुमारे मंडल अधिकारी आणि तलाठ्यांच्या पथकाने गुरसाळे येथील वाळु उपसा टिकाणी भेट दिली. त्यावेळी एक जेसीबी, चार टीप्पर आणि दोन ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू होता. पथक आलेले पाहताच वाळु उपसा करणारे तेथेच वाहने सोडून पळून गेले.

या वाहनांच्या जप्तीची आणि अन्य कारवाई सुरू करण्याची तयारी सुरु करण्यात आली.

या दहा १५ मिनिटाच्या कालावधींत सुमारे ३० ते ४० जणांचा जमाव हातात तलवारी, कोयते आणि कुऱ्हाडी घेऊन चाल करून आला. त्यांनी येताना तेथेच थांबा तुम्हाला खलास करतो, असे म्हणत पथकाला शिवीगाळ सुरू केली.

थोडे पुढे येताच या जमावाने या पथकावर तुफानी दगडफेक केली. त्यामुळे भरारी पथक वाळूच्या ढिगाच्या आडोशाने नदीपात्राच्या दिसेने पळून गेले. जीव वाचवण्यासाठी पळणाऱ्या या पथकाचा पाठलाग करण्याचा प्रयत्न या जमावाने केला.

पथकातील कोणी हाती लागत नाही हे लक्षात येताच जमावाने तेथे असणारे एक जेसीबी, तीन टिप्पर, दोन ट्रॅक्टर घेऊन पोबारा केला.

एक टीप्पर सुरू न झाल्याने तो जागेवर सोडून देण्यात आला. जमाव परतल्यानंतर धास्तावलेल्या पथकाने वाहनाजवळ येत तहसीलदारांना घटनेची माहिती दिली.

माहिती समजताच दरम्यान घटनेच्या थोड्याच वेळात तहसीलदार सचिन लंगुटे,अप्पर तहसीलदार तुषार शिंदे, तालुका पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, महसूलचे खर्डी मंडळ अधिकारी दिलीप सरवदे, बोहाळीचे तलाठी विष्णू व्यवहारे, अमर पाटील तलाठी सोनके, सुधाकर हिल्लाळ कोतवाल तावशी, सुधाकर चंदनशिवे कोतवाल खर्डी हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. यावेळी वाळू माफियांनी सोडून गेलेला टिपर ताब्यात घेण्यात आला. तातडीने घटनास्थळावर दाखल झाले.

सुराज्यने तहसीलदार सचीन लंगुटे यांच्याशी संपर्क साधला. ते म्हणाले, सध्या एफआयआर नोंदवण्यात येत आहे. तो नोंदवून झाल्यावर आम्ही अधिकृतपणे माहिती देऊ.

या घटनेमुळे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद काय भूमिका घेणार? महसूल प्रशासन अशा वाळू माफियां बाबत कार्वाइची काय भूमिका घेणार? यांच्यावर कारवाई होणार का? याकडे आता सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे. कारवाईची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### धाडस होतेच कसे

महसूल खात्याच्या शासकीय पथकावर कारवाई करण्याचे धाडस वाळू माफिया करूच कसे शकतात? माफियांची मजल येथपर्यंत पोहोचण्याआधी पोलिस प्रसासन झोपले होते का? या हल्ल्याचा सूत्रधार असणाऱ्या वाळू माफियाला अटक होणार का? असे अनेक सवाल जनतेच्या मनात उमटत आहे.

### महसूल प्रशासनाचे चुकते काय?

तहसीलदार सचिन लंगोटे यांनी तहसीलदार पदाची सूत्रे घेतल्यानंतर वाळू माफियांना लगाम घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या आधीच्या काही अधिकाऱ्यांनी वाळू माफियांकडे ‘अर्थपूर्ण’ दुर्लक्ष केले होते. त्यातील काही अधिकाऱ्यांवर कारवाईचे असणारे प्रस्ताव जिल्हा महसूल प्रशासनाने दाबून ठेवल्याची चर्चा महसूल प्रशासनात होत आहे. त्यामुळेच वाळू माफियांनी तहसीलदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला असावा. मात्र या फथकात ते नसल्यामुळे बचावले, असेही तहसील कार्यालयाच्या वर्तुळात बोलले जाते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सागर किणारे...!